**महाराष्ट्र शासन**
**उमेद- महाराष्ट्र राज्य ग्रामिण जीवनोन्नती अभियान**
**ग्राम विकास व जलसंधारण विभाग, महाराष्ट्र राज्य**
**जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष, गोंदिया**
११/१०३९, साकेत पब्लीक शाळेजवळ , गणेश नगर गोंदिया
ईमेलdmmugondia@gmail.com फोन नं ०७१८२ - २३६६२०

# जाहिरात

## विविध प्रशिक्षण/कार्यशाळेकरिता तिरोडा तालुका येथील प्रशिक्षण स्थळ/ कार्यशाळेच्या ठिकाणी जेवण, चहा,नास्ता पुरवठा करण्यास्तव १ वर्ष कालावधीकरिता करार करण्यासाठी इच्छुक स्वयं सहाय्यता समुह किंवा ग्रामसंघ कडुन पुरवठादार नोंदणी करिता अर्ज आमंत्रण

ग्रामीण भागातील दारिद्रय निर्मूलन करण्यासाठी केंद्र शासनाने ग्रामविकास मंत्रालयाच्या माध्यमातून व जागतिक बँकेच्या अर्थसहायाने दिनदयाळ अंत्योदय योजना (राष्ट्रीय ग्रामिण जीवनोन्नती अभियानाची ) सुरुवात केली आहे. या अभियानाच्या अंमलबजावणीसाठी राज्यात उमेद-महाराष्ट्र राज्य ग्रामिण जीवनोन्नती अभियानाची स्थापना करण्यात आली आहे. या अभियानाची अंमलबजावणी गोदिया जिल्हयात जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्षामार्फत करण्यात येते. अभियानांतर्गत विविध प्रशिक्षण/ कार्यशाळेचे आयोजन मोठयाप्रमाणात करण्यात येत आहे. त्याकरिता प्रशिक्षण/ कार्यशाळेकरिता लागणाऱ्या जेवण, चहा, नास्ता खरेदी करण्यासाठी एक वर्ष कालावधीसाठी Frame work agreement करण्याचे प्रस्तावित आहे. त्याकरिता स्वयं सहाय्यता समुह किंवा ग्रामसंघाकडुन मर्यादित ई-निविदा (Limited e-tender) प्रणालीव्दारे निविदा मागविण्यात येणार आहे. जेवण,चहा,नास्ता पुरवठा करण्यासाठी इच्छुक स्वयं सहाय्यता समुह व ग्रामसंघाकडे आवश्यक संसाधने उपलब्ध होणे गरजेचे आहे.

सदर निविदा प्रक्रियेमध्ये सहभागी होण्यासाठी स्वयं सहाय्यता समुह व ग्रामसंघाकडे खालील बाबी असणे आवश्यक आहे.

१. DSC (Digital Signature Certificate),
२. http://mahatenders.gov.inया संकेतस्थळ/पोर्टल वर नोंदणीकृत असावा.
३. Shop And Estabeshment Act अंतर्गत नोंदणी किंवा नगरपंचायत/ ग्रामपंचायत कडुन कॅटरिंग (जेवण, चहा, नास्ता पुरविणे) चा व्यवसाय करण्यास परवानगी/ ना हरकत प्रमाणपत्र.
४. PAN कार्ड असावे.
५. स्वयं सहाय्यता समुह किंवा ग्रामसंघाची नोंदणी NRLM NIC Portel वर असणे आवश्यक आहे.
६. स्वयं सहाय्यता समुह किंवा ग्रामसंघाचा बॅंक पासबुक ची छायाप्रत.
७. Food safty & Standard Act अंतर्गत परवाना सादर करावा लागेल.सदर परवाना नसल्यास कंत्राट मिळाल्यानंतर ३० दिवसात सदर परवाना प्राप्त करुन या कार्यालयाला सादर करण्याचे हमी पत्र सादर करावे लागेल.

वरील अटींची पूर्तता करणाऱ्या प्रशिक्षण स्थळ/ कार्यशाळेच्या ठिकाणी जेवण, चहा,नास्ता पुरवठा करण्यास्तव १ वर्ष कालावधीकरिता करार करण्यासाठी इच्छुक स्वयं सहाय्यता समुह किंवा ग्रामसंघ यांनी त्यांच्या http://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर नोंदणीकृत केलेला Login Id तसेच क्र. ३ व ७ मध्ये नमूद केलेल्या कागदपत्रासह महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष, ११/१०३९, साकेत पब्लीक शाळेजवळ , गणेश नगर गोंदिया या पत्यावर दिनांक ०६/०३/२०१७ दुपारी ३.०० वाजेपर्यंत लेखी अर्ज करण्यात यावा.सदर अर्ज procurementgondia@gmail.com या ईमेल वर सुध्दा सादर करता येवू शकेल. कोणत्याही कारणास्तव मुदतीनंतर प्राप्त होणाऱ्या अर्जाचा सदर ई-निविदा प्रक्रियेमध्ये सहभागी करुन घेता येणार नाही याची कृपया नोंद घ्यावी. सदर निविदा प्रक्रियमध्ये सहभागी होण्यासाठी इच्छुक स्वयं सहाय्यता समुह किंवा ग्रामसंघ यांच्याकडून कोणतीही निविदा शुल्क व EMD घेण्यात येणार नाही.

**जिल्हा अभियान संचालक**
**उमेद - महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान,**
**गोंदिया**